# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

## एकात्मिक आरोग्य व कुटंब कल्याण सोसायटी, महानगरपालिका नागपुर

## आरोग्य विभाग सिव्हिल लाईन्स, महानगरपालिका नागपूर.

### कंत्राटी पदभरती २०२४-२५

आरोग्य विभाग महानगरपालिका नागपूर यांचे नियंत्रणाखालील **एकात्मिक आरोग्य व कुटंब कल्याण सोसायटी, महानगरपालिका नागपुर** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी स्वरुपात प्रयोगशाळा तंत्रज्ञ व टीबी हेल्थ व्हिजीटर हि पदे भरण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी खाली दिलेल्या लिंकवरुन ऑनलाईन गुगल फॉर्म भरावयाचा आहे. उमेदवारांनी भरलेल्या अर्जाची हार्ड कॉपी व संबधित शैक्षणिक कागदपत्र कार्यालयात दिनांक ०१/०४/२०२५ ते ०७/०४/२०२५ सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत (शनिवार व रविवार तसेच सुटीचे दिवस वगळुन) कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावेत.

| | |
|---|---|
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचे अर्जाकरीता लिंक व स्कॅनर<br>https://forms.gle/qoeuYPog3xfB543N7 | टीबी हेल्थ व्हिजीटर या पदाकरीता ऑनलाईन अर्ज न भरता उमेदवारांनी ऑफलाईन अर्ज भरुन कार्यालयात नमुद दिनांकास सादर करावा. |

### भरावयाचा रिक्त पदांचा तपशिल

| अ. क्र. | पदाचे नाव | संख्या व जातीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | **Preferential Qualification** | प्रतिमाह मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) | अ.जा. (SC)-2,<br>विमाप्र (SBC)-1,<br>भ.ज.-ड (NT-D)-1,<br>खुला (OPEN)- ३<br>(एकुण पदे-७) | $12^{th}$ + DMLT<br>(नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक)<br>(उच्च शैक्षणिक अर्हता धारकांना प्राधान्य) | | रु. १७,०००/ |
| २ | टीबी हेल्थ व्हिजीटर (Tuberculosis Health visitor - T.B.H.V.) | भ.ज.(क) (**NT(C)**) -१ | 1. Graduate in science **OR**<br>2. Intermediate (10+2) in science and experience of working as MPW/LHV/ANM/ Health Worker / Certificate **or** higher course in Health Education/ Councelling **OR**<br>3. Tuberculosis health visitor's recognized course<br>4. Certificate course in computer operations (minimum two months) | Training course for MPW or recognized sanitary inspector's course | रु. १५,५००/ |

१) वयामर्यादा - मागासवर्गीय करीता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे व खुल्या प्रवर्गाकरीता कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे (NHM मध्ये कार्यरत असल्यास वयाची अट लागू नाही)

२) इच्छुक उमेदवारांनी अर्जासोबत मागासर्वीय प्रवर्गाकरीता रु.१००/- व खुल्या प्रवर्गाकरीता रु. १५०/- चे धनाकर्ष (DD) (ना परतावा) "Corporation Integrated Health & Family Wellfare Society, Nagpur, payble at Nagpur (A/C No. 60401911738, IFSC CODE MAHB0001195) यांचे नावाने देय असलेला राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (DD) अर्जासोबत जोडावा. उमेदवाराने धनाकर्षाच्या मागे स्वत:चे नाव लिहावे.

३) इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीसह नमुद वेळेत अर्ज समक्ष कार्यालयात सादर करावा. रजिस्टर डाकद्वारे/कुरीयरने पाठविण्यात आलेले अर्ज नियोजीत कालावधीत दि. ०७/०४/२०२५ पर्यंत कार्यालयात प्राप्त झाल्यास अर्जाचा विचार करण्यात येईल.

- अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- नागपूर महानगरपालिका, आरोग्य विभाग, पाचवा माळा, छत्रपती शिवाजी महाराज नविन प्रशासकिय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१
- सदर पदांकरीता प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार नाही. उमेदवारांच्या गुणांची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात येईल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक (Qualifing Exam) मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टककेवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = 60*50/100=30) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण.<br>मिळालेल्या एकुण गुणांच्या टककेवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा.१. स्टाफ नर्स पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.SC (Nuring) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% Proportion प्रमाणे =60*20/100=12 गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | शासकीय अनुभव प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण व खाजगी अनुभव प्रत्येक वर्षासाठी ३ गुण<br>(जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकुण १०० गुण |

## अटी व शर्ती

१) अनुभवाच्या बाबतीत खाजगी व शासकीय अनुभव ग्राहय धरण्यात येईल. (अनुभव प्रमाणपत्रावर अनुभवाचा कालावधी, दिनांक, स्वाक्षरी, स्टॅम्प, आवक-जावक क्र. इ. बाबींचा योग्य उल्लेख असावा. अनुभव प्रमाणपत्राची पडताळणी करुनच अनुभवाचे गुण देण्यात येतील.)

२) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा, व अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झाला नसावा.

३) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

४) सदर पदाकरीता प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार नाही. उमेदवारांची निवड मेरीटप्रमाणे करण्यात येईल. सदरील पदे हि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत निव्वळ कंत्राटी स्वरुपाची राहतील. त्यांचा नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसलाही संबंध राहणार नाही. पदांसाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

५) वरील सर्व पदे ही कंत्राटी पद्धतीने भरण्यात येत असल्याने त्यास नागरी सेवा नियम लागू होणार नाही.

६) एकुण पदांच्या संख्येत अथवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

७) सदरील पदे हि निव्वळ कंत्राटी पद्धतीने केवळ प्रकल्प कालावधी पुरते भरावयाचे असून प्रकल्प बंद होताच सदर पदे आपोआप संपुष्टात येतील.

८) उमेदवाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती संलग्न कराव्यात.

- नुकताच काढलेला पासपोर्ट साईझ फोटो-१ व स्वतःचा ई-मेल व दुरध्वनी क्रमांक
- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा राहिवासी असल्याचे प्रमाणपत्र
- प्रवर्गामध्ये अर्ज केलेला असल्यास जात प्रमाणपत्र
- जन्म तारखेचे प्रमाणपत्र (शाळा/महाविद्यालय सोडण्याचे प्रमाणपत्र/जन्माचे प्रमाणपत्र)
- ओळखपत्र-आधार कार्ड/मतदान कार्ड/ड्रायव्हिंग लायसंस
- पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेची अंतिम वर्षाची गुणपत्रीका व पदानुसार शासनातर्फे प्राप्त रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र व नुतनीकरण
- पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेशिवाय प्राप्त पदव्युत्तर पदवी (PG Degree) आणि पदव्युत्तर पदवीका (PG Diploma) प्रमाणपत्र

- प्रमाणीत केलेले अनुभव प्रमाणपत्र

९) उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल.

१०) उमेदवारांचे वय, अनुभव, शैक्षणिक अर्हता व नोंदनी जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापर्यंत ग्राहय धरले जाईल.

११) कोणत्याही वेळेस भरती अथवा निवड प्रक्रिया रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समिती यांना राहतील त्यावर कोणतीही हरकत/आक्षेप घेता येणार नाही.

१२) आवेदन पत्र स्विकृत/अस्विकृत करण्याचे अधिकार, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करण्याचे तसेच त्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याबाबतचे संपुर्ण अधिकारी अध्यक्ष निवड समिती तथा आयुक्त म.न.पा. नागपूर यांचेकडे राखुन ठेवलेले आहे.

१३) उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाब आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

१४) निवड झालेल्या उमेदवाराने रुजु होतांना विहित नमुन्यात रुपये १००/- च्या बॉन्डपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. (सेवेदरम्यान करारनाम्याच्या अटी काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहिल.)

१५) ज्या पदाकरीता बिंदू नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती जाहिरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेद्वारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

१६) सविस्तर जाहिरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/प्रतीक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबतची सर्व माहिती/सुचना https://www.nmcnagpur.gov.in/public-notices या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

- स्वा -

वैद्यकिय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव
निवड समिती (एन.यु.एच.एम.)
महानगरपालिका, नागपूर